मुंबई : मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना अभिवादन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे आयोजित कार्यक्रमाला मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक (जीएम) राजीव श्रीवास्तव आणि मुंबई विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) हिरेश मीणा गैरहजर होते. विशेष म्हणजे, शहिदांच्या स्मारकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या संविधान दिनाच्या कार्यक्रमांना मात्र दोन्ही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांच्या अनुपस्थितीबद्दल रेल्वे कर्मचारी संघटनांनी नाराजी व्यक्त केली.

सीएसएमटी येथील हे स्मारक डीआरएम कार्यालयापासून १०० मीटरपेक्षा कमी, तर महाव्यवस्थापक कार्यालयापासून सुमारे ३०० मीटर अंतरावर आहे. मध्य रेल्वेच्या यापूर्वीच्या महाव्यवस्थापक आणि विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडून दरवर्षी या स्मारकाला भेट देऊन हुतात्म्यांना अभिवादन करण्याची परंपरा पाळली जात होती. मात्र, यावर्षी दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे रेल्वे संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.



यापूर्वी अपवादात्मक परिस्थितीत किंवा विशेष प्रसंगी 'जीएम' उपस्थित राहिले असण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र गेल्या दोन-तीन वर्षांत डीआरएम किंवा जीएम या कार्यक्रमासाठी गेलेले नाहीत.
- डॉ. स्वप्नील नीला, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे

'आरपीझेड' आरक्षण कायम

शीळ-महापे पट्ट्यासाठी राज्य सरकारचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

अडवली-भूतवलीतील ३०० एकरचा समावेश

नवी मुंबई : महापे-शिळ मार्गालगतच्या अडवली-भूतवली परिसरातील सुमारे ३०० एकर हरित पट्ट्यावरील 'रिजनल पार्क झोन' (आरपीझेड) आरक्षण कायम ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या जागेवरील 'आरपीझेड' आरक्षण हटवून त्याचे निवासी क्षेत्रात रूपांतर करण्याचा नवी मुंबई महापालिकेचा प्रस्ताव होता. मात्र, विकास आराखड्याला अंतिम मंजुरी देताना शासनाने हा आरक्षण बदल स्वीकारला नव्हता. दरम्यान हरकती सूचनांच्या प्रक्रियेनंतर ही या परिसरातील सुमारे ३०० एकर हरित पट्टा बांधकामांपासून सुरक्षित ठेवण्याचा निर्णय नगर विकास विभागाने घेतला आहे. या आरक्षण बदलाचा विषय 'लोकसत्ता'ने सातत्याने लावून धरला होता.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर तब्बल ३३ वर्षांनी शहराचा पहिला सर्वंकष विकास आराखडा तयार करण्यात आला. ऑगस्ट २०२२ मध्ये प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध करून त्यावर नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्यानंतर फेब्रुवारी २०२४ मध्ये महापालिकेने अंतिम विकास आराखडा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला. या प्रक्रियेत शहरातील अनेक महत्त्वाच्या जागांवरील आरक्षणांमध्ये बदल करण्यात आल्याने विकास आराखडा वादग्रस्त ठरला होता. त्यात अडवली-भूतवली आणि बोरिवली या महसुली गावांमधील हरित पट्ट्याच्या आरक्षण बदलाचा विषय चर्चेत आला होता.

महापालिका हद्दीतील अडवली-भूतवली आणि बोरिवली या गावांच्या परिसरात सुमारे ११०० एकर जंगलक्षेत्र आहे. हा हरित पट्टा अबाधित ठेवून त्याठिकाणी 'रिजनल पार्क' विकसित करण्याच्या उद्देशाने महापालिकेने प्रारूप विकास आराखड्यात 'रिजनल पार्क झोन' (आरपीझेड) आरक्षण निश्चित केले होते. या परिसरात जंगलालगत मोठ्या प्रमाणात सपाट खासगी जमिनीही आहेत. मात्र, आरपीझेड आरक्षणामुळे जमिनींचा विकास करता येत नसल्याने काही जमीनमालकांनी त्याविरोधात हरकती नोंदवल्या होत्या. त्यानंतर या आरक्षणात बदल करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यामुळे महापे-शिळ मार्गालगत गृहसंकुले, व्यावसायिक प्रकल्प उभारण्याची शक्यता निर्माण झाली होती. या परिसरातील जमिनींमध्ये नवी मुंबई, ठाण्यातील नेते, गुंतवणूकदारांचे हितसंबंध असल्याची चर्चा होती.

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने २३ नोव्हेंबर २०२६ रोजी नवी मुंबईच्या विकास आराखड्याला अंतिम मंजुरी दिली. या अधिसूचनेत ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे, वाशी, सानपाडा, नेरूळ, बेलापूर आणि दिघा-इलठण परिसरातील अनेक आरक्षणे आणि भूवापरात बदल करण्यात आले आहेत. काही ठिकाणी आरक्षणांमध्ये बदल करून जमीन निवासी वापरासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, अडवली-भूतवली परिसरातील सुमारे ३०० एकर जागेवरील आरपीझेड आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे. अडवली, भूतवली आणि बोरिवली या तीन महसुली गावांच्या परिसरातील जेमतेम पाच हेक्टर क्षेत्राचा अपवाद वगळता उर्वरित हरित पट्ट्यावरील 'रिजनल पार्क झोन' आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर झालेला आरक्षण बदलाचा प्रस्ताव अंतिम विकास आराखड्यात स्वीकारण्यात आलेला नाही.

डॉ. पुलिकन, राल्टे, सुनीता कृष्णन यांना जमनालाल बजाज पुरस्कार

लोकसत्ता प्रतिनिधी

तुर्कीच्या परवीन सवरान यांचाही विजेत्यांमध्ये समावेश



मुंबई : भारत आणि परदेशात गांधीवादी विधायक कार्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल यंदा केरळचे डॉ. जेकब पुलिकन, मिझोरमच्या लालबियाकझुआला राल्टे, तेलंगणाच्या सुनीता कृष्णन आणि तुर्कीच्या परवीन सवरान यांचा ४८ व्या जमनालाल बजाज पुरस्काराने सन्मान करण्यात आला. जमनालाल बजाज फाऊंडेशनतर्फे आयोजित कार्यक्रमात भूतानच्या राजकुमारी सोनम देचान वांगचुक यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

भारतातील गांधीवादी तत्त्वांनुसार रचनात्मक व विधायक कार्यासाठी, ग्रामीण विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या उपयोगासाठी, महिला आणि बालकांच्या विकासासाठी व कल्याणासाठी (जानकीदेवी बजाज यांच्या स्मरणार्थ) आणि परदेशात गांधीवादी मूल्ये व विचारांचा प्रचार-प्रसार करणाऱ्या परदेशी नागरिकांना हा पुरस्कार देण्यात येतो. विजेत्यांना मानपत्र, स्मृतीचिन्ह आणि २० लाख रुपये रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष शेखर बजाज, नोबेल शांतता पारितोषिक विजेते आणि विश्वस्त कैलाश सत्यार्थी, विश्वस्त आणि फाऊंडेशनच्या मानद संचालक मीनल बजाज, सल्लागार परिषदेचे सदस्य आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. बजाज समूहाची १०० वर्षे आणि जमनालाल बजाज फाऊंडेशनची ५० वर्षामुळे यंदा पुरस्कार महत्त्वाचे ठरले.

डॉ. जेकब पुलिकन यांना तळागाळातील उपक्रमांद्वारे ग्रामीण आत्मनिर्भरता, स्थानिक उत्पादन आणि गांधीवादी शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल रचनात्मक कार्यासाठीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुलिकन यांनी केरळमध्ये विविध उपक्रमाद्वारे सुमारे साडेसात लाख नागरिकांना घरगुती उत्पादन तयार करण्याचे प्रशिक्षण दिले आहे. गांधी दर्शनच्या माध्यमातून ५० हजारांपेक्षा जास्त शिक्षकांना प्रशिक्षित केले आहे. मिझोरामच्या लालबियाकझुआला राल्टे यांनी पर्यावरणपूरक कृषी यंत्रसामग्री, तसेच डोंगराळ भागासाठी रोपवे विकसित केला. सुनीता कृष्णन यांनी 'प्रज्वला'च्या माध्यमातून ३३ हजारांहून अधिक महिला आणि मुलांची सुटका करून त्यांचे पुर्नवसन केले आहे. प्रतिबंधात्मक उपक्रमाद्वारे १७,५०० मुलांचे संरक्षण केले आहे.

शाश्वत मूल्यांचे रूपांतर अर्थपूर्ण कृतीत करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. यावर्षीच्या विजेत्यांनी उपजीविकेची साधने बळकट केली आहेत, महिला व मुलांचे संरक्षण केले आहे आणि शांततापूर्ण मार्गांनी समुदाय व पर्यावरणाचे रक्षण केले आहे.
- शेखर बजाज, अध्यक्ष,जमनालाल बजाज फाउंडेशनच्या विश्वस्त मंडळ.

सामाजिक परिवर्तनाची सुरुवात तेव्हा होते जेव्हा एखादी व्यक्ती सर्वात असुरक्षित घटकांच्या पाठीशी उभी राहते आणि अधिक न्याय्य समाजनिर्मितीसाठी स्वतःला समर्पित करते.
- कैलाश सत्यार्थी, विश्वस्त, जमनालाल बजाज फाउंडेशन

स्थानिक उद्योजकता, योग्य तंत्रज्ञान, संस्थात्मक सुधारणा किंवा पर्यावरण संवर्धन यांसारख्या माध्यमांतून ज्ञान आणि उद्देशाचे रूपांतर अशा उपायांमध्ये केले आहे.यामुळे लोकांचे जीवन सुधारू शकतात आणि दीर्घकालीन प्रभाव पाडू शकतात.
- डॉ. आर. ए. माशेलकर, अध्यक्ष,जमनालाल बजाज फाउंडेशनचे विश्वस्त आणि सल्लागार परिषद

आजच्या विखुरलेल्या जगात, गांधीवादी तत्त्वज्ञान हे सहानुभूती, संवाद आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाची एक वैश्विक भाषा प्रदान करते.
- मीनल बजाज, विश्वस्त, जमनालाल बजाज फाउंडेशन

तुर्कीमध्ये वनक्षेत्र संवर्धन

फिरते पशुपालन, चराईचे हक्क, पारंपरिक पर्यावरणीय ज्ञान आणि जैव-सांस्कृतिक वारसा यांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या अहिंसक कार्याबद्दल तुर्कीच्या परवीन सवरान यांना पुरस्कार दिला. परवीन सवरान यांच्यामुळे तुर्कीमधील सरकारी वनक्षेत्रे पुन्हा एकदा नियोजित आणि शाश्वतपणे चरण्यासाठी खुली झाली.

सरकारी वकील पदांची थेट भरती कायम ठेवा

उच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) अतिरिक्त सरकारी वकिलांच्या (गट-अ) पदांच्या २४४ जागांसाठी जाहीर केलेली थेट भरती कायम ठेवण्याचे आणि याचिका निकाली निघेपर्यंत पदोन्नतीची प्रक्रिया तूर्त पुढे न नेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच राज्य सरकारला दिले. भरती संबंधित नियमांना बगल देण्याच्या सरकारच्या निर्णयावरही न्यायालयाने यावेळी प्रश्न उपस्थित केला.

एमपीएससीने जाहीर केलेल्या या थेट भरती प्रक्रियेतील त्रुटींविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्याद्वारे भरतीसंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या नव्या शासननिर्णयामुळे भरती नियमांमध्ये बदल होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने याचिकेची दखल घेऊन सरकारला यासंदर्भात प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. तसेच, प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत पदोन्नतीची प्रक्रिया पुढे न नेण्याचे स्पष्ट केले. पुरुषोत्तम सुरेश क्षीरसागर यांनी वकील उदय वारुंजीकर यांच्यामार्फत ही याचिका केली आहे.

वृक्षतोडीच्या बदल्यात १.६५ लाख झाडांची लागवड

लोकसत्ता प्रतिनिधी

'टोरंट'चा उच्च न्यायालयात दावा

एका ग्रामसभेची मंजुरी प्रलंबित

मुंबई : कर्जत येथे तीन हजार मेगावॉटच्या 'पंप स्टोरेज' वीज निर्मिती प्रकल्पासाठी भीमाशंकर परिसरातील ३२ ते ३३ हजार झाडे तोडण्याच्या मोबदल्यात कर्जतमध्ये ७५ हजार, तर साताऱ्यात ९० हजार अशी एकूण १ लाख ६५ हजार झाडे लावण्यात येत असल्याचा दावा 'टोरंट पॉवर' कंपनीच्या वतीने गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयात करण्यात आला. याशिवाय, याचिकेत चुकीची माहिती दिली गेल्याचा दावाही कंपनीने केला.

सामाजिक कार्यकर्ते शकील अहमद यांनी प्रकल्पासाठीच्या हजारो वृक्षतोडींचा मुद्दा जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयात उपस्थित केला आहे. ही याचिका सुनावणीसाठी गुरुवारी सूचीबद्ध होणे अपेक्षित होते. मात्र, ती सूचीबद्ध न झाल्याने मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे ती सादर करण्यात आली. त्यावेळी, प्रकल्पाला आधीच विविध पर्यावरणीय मंजुरी मिळाल्या आहेत, असे कंपनीतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. यावेळी याचिकाकर्त्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी वेळ मागितला. न्यायालयाने कंपनीची याबाबतची विनंती मान्य करून या प्रकरणी १८ डिसेंबर रोजी सुनावणी ठेवली.

प्रकल्पाच्या पर्यावरण मंजुरीच्या नोंदींमध्ये धाक गावातील ग्रामसभेची मंजुरी प्रलंबित असल्याचे नमूद आहे. या गावातील ९६.३९ हेक्टर वनजमीन आणि ७३.५५ हेक्टर खासगी जमीन प्रकल्पासाठी आवश्यक असून, ग्रामसभेच्या मंजुरीचा विषय कर्जतच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रलंबित असल्याकडे याचिकेत लक्ष वेधण्यात आले आहे. वनहक्क कायद्यातील कलम ४(५) नुसार वनवासींच्या हक्कांची पडताळणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना जमिनीतून बेदखल करता येत नाही. मात्र, प्रकल्पाला आणि त्यासाठी झाडे तोडण्यास परवानगी देताना याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी याचिकेत केला आहे.

दरम्यान, वनजमिनीच्या वापरबदलासह वृक्षतोडीला दिलेल्या परवानगीला या याचिकेत आव्हान देण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी वनजमिनीचा वापर बदल करण्यास वन विभागाने ६ ऑक्टोबर रोजी मंजुरी दिली होती. तर, १४ ऑक्टोबर रोजी वृक्षतोडीची बेकायदा परवानगी दिली गेली, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करताच घाईघाईने हे निर्णय घेतले गेले, असा दावा देखील याचिकाकर्त्यांने केला आहे.

टोरंट कंपनीतर्फे कर्जत तालुक्यात १३ हजार ५०५ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प उभारण्यात येणार असून त्यासाठी ३७७ हेक्टर जमीन आवश्यक आहे. त्यात २३३ हेक्टर वनजमिनीचा समावेश आहे.

ग्रंथ दालनांत फक्त 'सेल्फी'वाल्या विद्यार्थ्यांचीच गर्दी!

रेश्मा शिवडेकर, लोकसत्ता

मुंबई पुस्तक महोत्सवात खरेदीला थंड प्रतिसाद; विक्रेत्यांचा खर्चही निघेना



मुंबई : तब्बल एक तपानंतर 'नॅशनल बुक ट्रस्ट'तर्फे मुंबईत भरलेल्या पुस्तकांच्या भव्य महोत्सवात सेल्फी घेणाऱ्यांच्या गर्दीमुळे लाखों रूपयांचा खर्च करून मोठ्या आशेने आलेल्या विक्रेत्यांची मोठी निराशा झाली आहे. 'सेल्फी' घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गर्दीत चोखंदळ वाचक हरविल्याने पुस्तक खरेदीला फारसा प्रतिसाद नसल्याची विक्रेत्यांची आणि प्रकाशकांची खंत आहे.

दरम्यान, पुढील तीन दिवसात खरेदीने जोर घेतला नाही तर दिल्ली, उत्तर प्रदेश, तामिळनाडू, गुजरात अशा राज्याराज्यांतून आलेल्या विक्रेत्यांचा महोत्सवात सहभागी होण्याकरिता केलेला खर्चही निघेल की नाही, अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. प्रदर्शनात ललित, बाल, वैचारिक, धार्मिक, इतिहास, कला, तंत्रज्ञान, पर्यावरण अशा विविध पुस्तकांचा समावेश आहे. मात्र चोखंदळ आणि रसिक वाचक या महोत्सवाकडे फारसा फिरकलेला नाही. जो काही जेमतेम येत आहे, तोही सेल्फी घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गर्दीमुळे दालनापासून दुरावतो आहे, अशी तक्रार दिल्लीतील एका पुस्तक विक्रेत्याने केली. दोन-तीन दिवसांचा अनुभव पाहून काही विक्रेत्यांनी तर वाचनप्रेमी वाचकांनाच दालनात प्रवेश देण्यास सुरूवात केली आहे.

पाच गुणांमुळे गर्दी

पाच गुणांच्या अंतर्गत मूल्यांकनाकरिता शिक्षकांना सेल्फीद्वारे हजेरी पाठविणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे या महोत्सवाला उत्सवी स्वरूप आले आहे. परंतु प्रत्यक्ष पुस्तक खरेदीला थंड प्रतिसाद असल्याची तक्रार आणखी एकाने केली. ट्रस्टतर्फे गेल्या वर्षी पुण्यात भरलेल्या पुस्तक महोत्सवाला पुणेकर वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. महाराष्ट्राच्या आर्थिक राजधानीतही महोत्सवाला असाच प्रतिसाद मिळेल, असे वाटले होते. परंतु, आमची निराशा झाली आहे, असे 'कनक बुक्स'चे रमेश चौहान यांनी सांगितले. तर, मोठ्या आशेने दोन ते सात लाखांपर्यंत खर्च करून महाराष्ट्रासह नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, गुजरात सारख्या अन्य राज्यांतून जवळपास ३०० हून अधिक विक्रेते, प्रकाशक मुंबईत आले आहेत. काहींनी उत्साहात दोन ते चार दालने भरभरून पुस्तके मांडली. मात्र खरेदीने जोर घेतला नाही तर नुकसान सोसावे लागेल, असे 'नियोगी बुक्स'चे सुरज सुनील यांनी सांगितले.

विद्यार्थी फक्त सेल्फीसाठी दालनात येतात. काही जण पुस्तके चाळतात. मात्र अनेक जण ती निष्काळजीपणे हाताळतात. खरेदी तर काहीच करत नाहीत. त्या पेक्षा ती न आलेली बरी, अशी त्रासिक प्रतिक्रिया एका विक्रेत्याने दिली. या महोत्सवाचे संचालक युवराज मलिक यांच्याकडे विचारणा केली असता, प्रत्यक्षात खरेदी केली नाही तरी विद्यार्थी पुस्तकांच्या दालनांमधून फिरत आहेत, पुस्तके चाळत आहेत, हेही समाधानाचे आहे, असे सांगितले. तर आयोजक पवनकुमार त्रिपाठी यांनी सांगितले की, दर दिवशी लाखभर विद्यार्थी महोत्सवाला भेट देत आहेत. त्यातील सर्वांनाच वाचनाची आवड असेल नाही. परंतु, यापैकी २० टक्के विद्यार्थ्यांना जरी वाचनाविषयी कुतूहल निर्माण झाली तरी खूप काही साध्य करू.

परिवर्तनशील पुस्तकांना मागणी

महोत्सवातील भगतसिंग, लेनिन, कार्ल मार्क्स यांच्यावरील पुस्तकांच्या दालनात चांगली गर्दी होती. आमच्याकडे परिवर्तनशील, व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तींवरील पुस्तके आहे. तरूणांकडून या पुस्तकांना चांगली मागणी असल्याचे नवचेतना प्रकाशनच्या प्रतिनिधीने सांगितले. एकीकडे तामिळसारख्या प्रादेशिक भाषेचे दालन ओस पडले होते. दुसरीकडे याच दालनाच्या शेजारी असलेली उर्दू पुस्तकांच्या दालनात चांगलीच गर्दी दिसून आली. पुस्तकांचा खपही चांगला झाल्याचे लखनऊच्या 'हिरा बुक'चे सयेद फैजुल हक यांनी सांगितले.

epaper.loksatta.com

Thomas Cook

थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ११ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई - ४०० ०१३
दूरध्वनी क्र.: +९१-२२-४२४२ ७००० फॅक्स क्र.: +९१-२२-२३०२ २८६४
संकेतस्थळ: https://www.thomascook.in | ई-मेल: sharedept@thomascook.in
कंपनी ओळख क्रमांक (CIN): L63040MH1978PLC020717

नमुना क्रमांक CAA २

[कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३०(३) आणि कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि ७ अन्वये]

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणासमोर
मुंबई खंडपीठ
कंपनी योजना अर्ज C.A. (CAA) / १८२ / MB / २०२६
कंपनी अधिनियम, २०१३ संदर्भात;
आणि
कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२, ६१, ६६ आणि इतर लागू तरतुदी, तसेच कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरण) नियम, २०१६, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण नियम, २०१६ आणि कंपनीच्या भागभांडवलात कपात करण्यासंबंधी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, २०१६ यांच्या अनुषंगाने दाखल केलेल्या अर्जाच्या संदर्भात;
आणि
थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड ("TCIL" किंवा "विभाजित कंपनी" किंवा "हस्तांतरित कंपनी") आणि स्टर्लिंग हॉलिडे रिसॉर्ट्स लिमिटेड ("SHRL" किंवा "परिणामी कंपनी") आणि TC ट्रिप सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("TCVSL" किंवा "हस्तांतरक कंपनी १") आणि जार्डिन ट्रॅव्हल सोल्यूशन्स लिमिटेड ("JTSL" किंवा "हस्तांतरक कंपनी २") आणि बॉर्डरलेस ट्रॅव्हल सर्व्हिसेस लिमिटेड ("BTSL" किंवा "हस्तांतरक कंपनी ३") तसेच त्यांचे संबंधित भागधारक यांच्यामधील संयुक्त व्यवस्था योजनेच्या संदर्भात (योजना).

थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड ही CIN L63040MH1978PLC020717 असलेली, सार्वजनिक मर्यादित कंपनी असून तिचे नोंदणीकृत कार्यालय ११ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ पूर्व, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००१३ येथे आहे.

... प्रथम अर्जदार / विभाजित / हस्तांतरित कंपनी

थॉमस कुक (इंडिया) लिमिटेडच्या समभागधारक आणि असुरक्षित धनको यांच्या सभांच्या सूचनेची संयुक्त जाहिरात

याद्वारे सूचना देण्यात येते की, ४ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे (यापुढे "आदेश" असे संबोधले आहे), माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (यापुढे "NCLT" असे संबोधले आहे) यांनी थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड ("कंपनी") यांच्या समभागधारकांची आणि असुरक्षित धनको यांची सभा बोलावण्याचे निर्देश दिले आहेत. या सभांचा उद्देश थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड ("TCIL" किंवा "विभाजित कंपनी" किंवा "हस्तांतरित कंपनी") आणि स्टर्लिंग हॉलिडे रिसॉर्ट्स लिमिटेड ("SHRL" किंवा "परिणामी कंपनी") आणि TC ट्रिप्सा सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("TCVSL" किंवा "हस्तांतरक कंपनी १") आणि जार्डिन ट्रॅव्हल सोल्यूशन्स लिमिटेड ("JTSL" किंवा "हस्तांतरक कंपनी २") आणि बॉर्डरलेस ट्रॅव्हल सर्व्हिसेस लिमिटेड ("BTSL" किंवा "हस्तांतरक कंपनी ३") तसेच त्यांचे संबंधित भागधारक यांच्यामधील संयुक्त व्यवस्था योजनेचा विचार करणे आणि योग्य वाटल्यास, त्यात बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजुरी देणे हा आहे. ही योजना कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२, ६१, ६६ आणि इतर लागू तरतुदी तसेच कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरण) नियम, २०१६, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण नियम, २०१६ आणि कंपनीच्या भागभांडवलात कपात करण्यासंबंधी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, २०१६ यांच्या अनुषंगाने आहे ("योजना").

वरील आदेशांनुसार आणि त्यामध्ये दिलेल्या निर्देशांप्रमाणे, कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") मधील लागू तरतुदी व वेळोवेळी सुधारित केलेली त्याअंतर्गत जारी परिपत्रके आणि SEBI (सूचीबद्धतेची बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ ("SEBI LODR") यांचे पालन करून, कंपनीच्या 'समभागधारकांची' आणि 'असुरक्षित धनको' यांच्या स्वतंत्र सभा केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे ("VC/OAVM") खाली नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार आयोजित केल्या जातील. संबंधित समभागधारक आणि असुरक्षित धनको यांना त्या दिवशी व वेळी सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे:

अ.क्र.	सभेचा वर्ग	वेळ (IST)	सभेचीतारीख/कोरम*
१.	समभागधारक	दुपारी २:००	२१ डिसेंबर २०२६ / ३०
२.	असुरक्षित धनको	दुपारी ३:३०	२१ डिसेंबर २०२६ / ३०

(*NCLT आदेशाच्या परिच्छेद ३४(vii) नुसार, सभेच्या प्रारंभी आवश्यक कोरम उपस्थित नसल्यास सभा ३० (तीस) मिनिटांसाठी तहकूब केली जाईल. त्यानंतर उपस्थित राहून मतदान करणारे सदस्य कोरम पूर्ण करणारे मानले जातील.)

VC/OAVM द्वारे सभेत सहभागी होण्याच्या सविस्तर सूचना तसेच "सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदान" किंवा "सभेदरम्यान ई-मतदान" द्वारे मतदान करण्याची पद्धत संबंधित सभांच्या सूचनांमधील टिपांमध्ये दिलेली आहे. वरील सभेची सूचना आणि त्यासोबतची कागदपत्रे खाली नमूद केल्याप्रमाणे पाठविण्यात आली आहेत:

अ. समभागधारकांना २६ नोव्हेंबर २०२६ रोजी, ज्यांची नावे शुक्रवार, २० नोव्हेंबर २०२६ रोजी डिपॉझिटरीजकडे ठेवलेल्या सदस्य नोंदवहीत/लाभधारकांच्या यादीत आहेत, त्यांना:

(i) ज्या समभागधारकांचे ई-मेल ID कंपनी, RTA आणि तिच्या डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून;

(ii) ज्या समभागधारकांचे ई-मेल ID कंपनी, RTA आणि तिच्या डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांना कंपनीकडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या शेवटच्या ज्ञात नोंदणीकृत पत्त्यावर सभेच्या सूचनेची वेब-लिंक आणि मार्ग नमूद असलेले पत्र स्पीड पोस्टद्वारे;

ब. असुरक्षित धनको यांना २६ नोव्हेंबर २०२६ रोजी, ज्यांची नावे मंगळवार, ३० जून २०२६ रोजी कंपनीच्या अभिलेखांमध्ये आहेत, त्यांना:

(i) ज्या असुरक्षित धनकोचे ई-मेल ID कंपनीकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून;

(ii) ज्या असुरक्षित धनकोचे ई-मेल ID कंपनीकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांना कंपनीकडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या शेवटच्या ज्ञात नोंदणीकृत पत्त्यावर असुरक्षित धनकोच्या सभेच्या सूचनेची वेब-लिंक आणि मार्ग नमूद असलेले पत्र स्पीड पोस्टद्वारे.

सभेच्या सूचना, योजनेची प्रत, तसेच अधिनियमाच्या कलम १०२ सह वाचलेल्या कलम २३० आणि २३२ व इतर लागू तरतुदी आणि कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ अन्वये आवश्यक स्पष्टीकरणात्मक निवेदन, कंपनीच्या https://www.thomascook.in/-composite-scheme या संकेतस्थळावरून तसेच नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड आणि BSE लिमिटेड या स्टॉक एक्स्चेंजच्या अनुक्रमे www.nseindia.com आणि www.bseindia.com या संकेतस्थळांवरून आणि NSDL च्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावरून पाहता/डाउनलोड करता येतील. ही कागदपत्रे सभेच्या तारखेच्या एक दिवस आधीपर्यंत, सकाळी १०:३० ते दुपारी १:३० या वेळेत, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून विनामूल्य मिळू शकतात: ११ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००१३. समभागधारकांनी sharedept@thomascook.in या ई-मेलवर तपशीलांसह विनंती पाठवूनही ही कागदपत्रे मिळवू शकतात. धनकोसाठी कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी CA हर्ष सी. रुपारेलिया, व्यावसायिक, यांचे कार्यालय: १८०४, १८ वा मजला, अनमोल प्राइड, पटेल ऑटोसमीर, एस. व्ही. रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० १०४ येथे ही कागदपत्रे उपलब्ध असतील.

कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("NSDL"), M/s. MUFG इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनीची नोंदणी व हस्तांतरण प्रतिनिधी ("RTA") आणि तिच्या डिपॉझिटरीज यांच्या सुविधेद्वारे दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान ("दूरस्थ ई-मतदान") आणि वरील सभांदरम्यान "ई-मतदान" करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यामुळे कंपनीचे समभागधारक आणि असुरक्षित धनको यांना त्यांच्या संबंधित सभांमध्ये मंजुरीसाठी मांडण्यात येणाऱ्या ठरावांवर मतदान करता येईल. समभागधारक आणि असुरक्षित धनको यांना योजनेच्या मंजुरीसाठीच्या ठरावावर (अ) दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान ("दूरस्थ ई-मतदान") किंवा (ब) सभा समाप्त झाल्यानंतर १५ मिनिटांसाठी आभासी पद्धतीने होणाऱ्या सभेत उपलब्ध ई-मतदान प्रणालीद्वारे ("सभेतील ई-मतदान") मतदान करण्याची सुविधा आणि पर्याय असेल.

ई-मतदान (दूरस्थ ई-मतदानासह) यासाठीची अंतिम तारीख आणि "दूरस्थ ई-मतदान"चा कालावधी/वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे:

तपशील	समभागधारक	असुरक्षित धनको

रिझर्व्ह बँकेकडून सहा महिन्यांत ६० टन सोने मायदेशी

मुंबई: रिझर्व्ह बँकेने एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या सहा महिन्यांत परदेशात लंडनमधील तिजोऱ्यांत ठेवलेले ६०.०८ टन सोने भारतात आणले आहे. त्यामुळे देशांतर्गत सोन्याचा साठा ७४०.१३ टनांवर पोहोचला असून, रिझर्व्ह बँकेच्या एकूण सोन्याच्या साठ्यापैकी सुमारे ८४ टक्के सोने आता भारतात आहे. मार्च २०२६ अखेर हे प्रमाण ७७.२३ टक्के होते.

विशेष म्हणजे, मार्च ते सप्टेंबर या काळात रिझर्व्ह बँकेच्या एकूण सोन्याच्या साठ्यात वाढ झालेली नसून, केवळ परदेशातील तिजोऱ्यांमधून सोने भारतात हलवण्यात आले आहे. मुंबई आणि नागपूर येथील उच्च-सुरक्षा तिजोऱ्यांत हा साठा ठेवण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेच्या परकीय चलनसाठ्याच्या व्यवस्थापनासंबंधीच्या सहामाही अहवालातील आकडेवारीनुसार, सप्टेंबर २०२६ अखेर रिझर्व्ह बँकेकडे एकूण ८८०.५२ टन सोन्याचा साठा होता.

दुसऱ्या तिमाहीत ७.६ टक्के विकासदराचा अंदाज

पीटीआय, नवी दिल्ली



आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकासदर ७.६ टक्के राहण्याचा अंदाज 'इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्च'ने गुरुवारी व्यक्त केला. गुंतवणुकीतील वाढ हा आर्थिक विकासाचा प्रमुख आधार ठरणार असल्याचे तिने म्हटले आहे. याशिवाय, संपूर्ण आर्थिक वर्षासाठीचा विकासदराचा अंदाजही पूर्वीच्या ७.१ टक्क्यांवरून, तिने ७.२ टक्के असा सुधारला आहे.

जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीसाठी अंदाजित विकासदर हा गेल्या आर्थिक वर्षातील याच कालावधीत नोंदवलेल्या ८.१ टक्क्यांपेक्षा कमी आहे. तर पहिल्या तिमाहीत नोंदवल्या गेलेल्या ७.८ टक्के दराच्या तुलनेतही तो कमी आहे. केंद्र सरकार येत्या सोमवारी, ३० नोव्हेंबरला दुसऱ्या तिमाहीच्या सकल देशांतर्गत उत्पादनाची (जीडीपी) आकडेवारी जाहीर करणार आहे.

रिझर्व्ह बँकेने दुसऱ्या तिमाहीसाठी ७.२ टक्के विकासदराचा अंदाज व्यक्त केला आहे. अर्थमंत्रालयाच्या मासिक आर्थिक आढाव्यात हा दर ७.३५ टक्के राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. संपूर्ण आर्थिक वर्षासाठी रिझर्व्ह बँकेचा विकासदराचा अंदाज ७.१ टक्के आहे. त्या तुलनेत 'इंडिया रेटिंग्ज'चा सुधारित ७.२ टक्क्यांचा अंदाज अधिक आहे.

चालू आर्थिक वर्ष हे सात टक्क्यांहून अधिक आर्थिक वाढ नोंदवणारे सलग सहावे वर्ष ठरण्याची शक्यता आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ ते २०२६-२७ या कालावधीत गुंतवणुकीचा सरासरी वाढीचा दर १० टक्के, तर खासगी उपभोगाचा दर ७.७ टक्के राहिला आहे. त्यामुळे उपभोगाच्या तुलनेत गुंतवणुकीचा वेग अधिक असल्याचे पतमानांकन संस्थेने नमूद केले आहे.

गुंतवणुकीत १०.५ टक्के वाढीचा अंदाज

दुसऱ्या तिमाहीत एकूण स्थिर भांडवल निर्मितीत वार्षिक आधारावर १०.५ टक्के वाढ होण्याचा अंदाज 'इंडिया रेटिंग्ज'ने व्यक्त केला आहे. उत्पादन आणि आयातीशी संबंधित गुंतवणुकीचे निर्देशकही या तिमाहीत मजबूत राहिल्याचे तिने म्हटले आहे. दरम्यान, खासगी उपभोगातील वाढ मंदावण्याची शक्यता आहे. खासगी अंतिम उपभोग खर्चाचा वाढीचा दर पहिल्या तिमाहीतील ७.१ टक्क्यांवरून दुसऱ्या तिमाहीत ६.८ टक्क्यांपर्यंत घसरण्याचा अंदाज आहे. वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) संकलन, कर्जवाढ, वाहन उत्पादन आणि टिकाऊ वस्तूंचे उत्पादन हे उपभोग स्थिर असल्याचे संकेत देत आहेत.

'एनएसई'चे बाजारमूल्य सहा लाख कोटींच्या उंबरठ्यावर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : राष्ट्रीय शेअर बाजाराने (एनएसई) जागतिक पातळीवर आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. एनएसईने बाजारमूल्याच्या बाबतीत जर्मनीच्या डॉइशे बोर्स आणि ब्रिटनच्या लंडन स्टॉक एक्स्चेंजला मागे सारत जगातील सर्वाधिक मौल्यवान शेअर बाजारमंचाच्या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे.

गुरुवारी, २६ नोव्हेंबर रोजी एनएसईच्या समभागात तेजी कायम राहिली. सलग दुसऱ्या सत्रात समभागाने वाढ नोंदवत व्यवहारादरम्यान २,४०० रुपयांची उच्चांकी पातळी गाठली. एनएसईचे बाजारमूल्य ६४.१ अब्ज डॉलर म्हणजेच सहा लाख कोटी रुपयांच्या उंबरठ्यावर पोहोचले असून अमेरिकेतील दोन दिग्गज बाजार मंचांनंतर आता एनएसईचा क्रमांक लागतो. जागतिक क्रमवारीत अमेरिकेतील सीएमई समूह १११.६ अब्ज डॉलर बाजारमूल्यासह पहिल्या क्रमांकावर आहे.

क्रेडिट कार्डचा वापर डेबिट कार्डच्या सहापट

ऑक्टोबरमध्ये एटीएममधून रोख उचलीसही जोर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी



मुंबई: देशात डिजिटल व्यवहारांना स्वीकृती वाढत असली तरी रोख रकमेवरील मदार अद्याप कायम असल्याचे रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीतून गुरुवारी स्पष्ट झाले. सरलेल्या ऑक्टोबर महिन्यात क्रेडिट कार्डच्या माध्यमातून झालेला खर्च अर्थात उधारी ही डेबिट कार्ड विनिमयांच्या तुलनेत सहापटीने अधिक होता. तसेच बँकांच्या एटीएममधून काढण्यात आलेल्या रोख रकमेचे मूल्य क्रेडिट कार्डवरील खर्चाच्या जवळपास पोहोचले आहे.

रिझर्व्ह बँकेच्या मासिक आकडेवारीनुसार, ऑक्टोबरमध्ये क्रेडिट कार्डच्या माध्यमातून सुमारे २.४५ लाख कोटी रुपयांचे उसनवारीचे व्यवहार झाले. याउलट डेबिट कार्डच्या माध्यमातून खरेदीसाठी झालेला खर्च ४०,४९२ कोटी रुपये होता. म्हणजेच यंदाच्या सणोत्सवात क्रेडिट कार्डचा विनियोग हा डेबिट कार्डच्या तुलनेत जवळपास सहापट अधिक होता.

क्रेडिट कार्डच्या वापरात ऑनलाइन व्यवहारांचा मोठा वाटा होता. ऑक्टोबरमध्ये या माध्यमातून क्रेडिट कार्डद्वारे १.५४ लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले. प्रत्यक्ष दुकानांमधील पॉइंट ऑफ सेल्स-'पॉस' यंत्रांवरून ९०,५६२ कोटी रुपयांचे खरेदी व्यवहार झाले. अन्य व्यवहारांचे मूल्य सुमारे ११९ कोटी रुपये होते.

दुसरीकडे, डेबिट कार्डचा वापर प्रामुख्याने प्रत्यक्ष खरेदीसाठी झाल्याचे दिसते. 'पॉस' यंत्रांद्वारे २४,९५७ कोटी रुपयांचे व्यवहार झाले, तर ऑनलाइन खरेदीसाठी १५,२८४ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

एटीएममधील रोख उचलही कायम

क्रेडिट कार्डचा वापर प्रामुख्याने खरेदीसाठी होत असताना, डेबिट कार्डचा वापर मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम काढण्यासाठी होत असल्याचे आकडेवारीतून दिसते. ऑक्टोबरमध्ये डेबिट कार्डच्या माध्यमातून एटीएममधून ४२.०४ कोटी व्यवहारांद्वारे २.३२ लाख कोटी रुपयांहून अधिक रोकड काढण्यात आली. क्रेडिट कार्डच्या माध्यमातून एटीएममधून रोख उचलही ४१५ कोटी रुपये होती. डेबिट कार्ड वापरून 'पॉस' यंत्रांद्वारे काढण्यात आलेली रोकड सुमारे १.२७ कोटी रुपये होती.

महिनाभरात ३५ लाख कोटींची भर!

बाजारातील तेजीने गुंतवणूकदारांच्या संपत्तीला बरकत

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : नोव्हेंबर महिन्यातील शेअर बाजारातील जोरदार तेजीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत तब्बल ३४.६१ लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. सेन्सेक्समध्ये जवळपास १३ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवणाऱ्या या महिन्यातील विक्रमी तेजीला परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची मोठी खरेदी, खनिज तेलाच्या किमतीतील नरमाई आणि कंपन्यांच्या अपेक्षेपेक्षा चांगल्या तिमाही निकालांनी झळाळी दिली आहे.

परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून सुरू असलेली खरेदी आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील समभागांना मिळालेली मोठी मागणी यामुळे गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी बाजारात तेजी कायम राहिली. सेन्सेक्स ३९०.३१ अंशांनी वधारून ८४,३२८.५९ अंशांवर बंद झाला. निफ्टी ६५.२५ अंशांच्या वाढीसह २५,८८४.५० अंशांवर स्थिरावला. दिवसभरातील व्यवहारांमध्ये सेन्सेक्सने ६१३.४६ अंशांची झेप घेत ८४,५५१.७४ अंशांची उच्चांकी पातळी गाठली होती. मात्र, अखेरच्या टप्प्यात काही प्रमाणात नफावसुली झाल्याने तेजी मर्यादित राहिली. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील समभागांना सर्वाधिक मागणी होती. सेन्सेक्समधील कंपन्यांमध्ये एचसीएल टेकचा समभाग ६.२८ टक्क्यांनी वधारला. त्यापाठोपाठ टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) ४.९७ टक्के, इन्फोसिस ४.७० टक्के आणि टेक महिंद्र ३.३३ टक्क्यांनी वधारले. एचडीएफसी बँक आणि टाटा स्टीलच्या समभागांतही अनुक्रमे २.७० आणि २.६७ टक्क्यांची वाढ झाली.

प्रत्येक अमेरिकी बालकाला 'स्पेसएक्स'चे दोन समभाग!

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि 'स्पेसएक्स'चे संस्थापक एलॉन मस्क यांनी अमेरिकेतील प्रत्येक मुलाला 'स्पेसएक्स'चे दोन समभाग देण्याची घोषणा केली आहे. यापैकी एक समभाग कंपनीकडून, तर दुसरा स्वतः मस्क यांच्याकडून दिला जाणार आहे. या समभागांचे एकूण बाजारमूल्य सुमारे १८ अब्ज डॉलर (अंदाजे १.६ लाख कोटी रुपये) आहे.

मस्क यांनी समाजमाध्यम 'एक्स'वरून यासंदर्भात माहिती दिली. त्यापूर्वी 'स्पेसएक्स'ने बुधवारी कंपनीच्या क्लास ए कॉमन स्टॉकचा एक नवीन समभाग अमेरिकेतील 'ट्रम्प अकाउंट' योजनेअंतर्गत सध्या सक्रिय असलेल्या प्रत्येक खात्याला देण्याची घोषणा केली होती. कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक समभागामागे आपणही एक समभाग देणार असल्याचे मस्क यांनी स्पष्ट केले. स्पेस एक्सप्लोरेशन टेक्नॉलॉजीज कॉर्प या कंपनीच्या नॅस्डॅकवरील एका समभागाची किंमत १२७.४४ अमेरिकी डॉलर आहे. २५ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या बंद भावानुसार रुपयात एका समभागाचे मूल्य ११,४०० रुपये होते. अमेरिकेतील १८ वर्षांखालील मुलांना लहान वयातच शेअर बाजारातील गुंतवणुकीची संधी मिळावी आणि त्यांना भविष्यासाठी संपत्ती निर्माण करता यावी, या उद्देशाने 'ट्रम्प अकाउंट' योजना सुरू करण्यात आली आहे. व्हाइट हाऊसच्या माहितीनुसार, गेल्या महिन्यापर्यंत या योजनेअंतर्गत जवळपास सात कोटी खाती उघडण्यात आली होती.

जीपी पारसिक बँकेला 'सर्वोत्तम बँकेचा प्रथम' पुरस्कार

मुंबई : सहकारी क्षेत्रातील आघाडीच्या जीपी पारसिक सहकारी बँकेने नुकतेच 'महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन'तर्फे दिला जाणारा ५,००० कोटींपेक्षा अधिक ठेवी असलेल्या बँकांच्या श्रेणीमध्ये 'सर्वोत्कृष्ट बँक -२००६ प्रथम क्रमांका'चा पुरस्कार पटकावला आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात बँकेने मिळविलेल्या विविध पुरस्कारांमध्ये या नव्या गौरवाची भर पडली आहे.

बँकेला उत्कृष्ट बँक, अनुत्पादित मालमत्तेचे (एनपीए) उत्कृष्ट व्यवस्थापन, कोकण विभागातील सर्वोत्कृष्ट बँक तसेच तंत्रज्ञानविषयक सर्वोत्तम अंमलबजावणी यासाठी पुरस्कार मिळाले आहेत. एफसीबीए बँकिंग फ्रंटियर्सतर्फे बुडीत कर्ज अर्थात एनपीए व्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'हॉल ऑफ फेम' पुरस्काराने बँकेचा गौरव करण्यात आला आहे. पान मार्केटिंग चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बँकेला कोकण विभागातील सर्वोत्कृष्ट बँकेचा पुरस्कार मिळाला. याशिवाय, नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्रातील पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट एनपीए व्यवस्थापन आणि उत्कृष्ट कोअर बँकिंग सोल्यूशन (सीबीएस) अंमलबजावणीसाठी बँकेला सन्मानित करण्यात आले आहे. याआधी २०२४-२५ या आर्थिक वर्षातही बँकेला एनपीए व्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'हॉल ऑफ फेम' पुरस्कार मिळाला होता. तसेच, पाच हजार कोटी रुपये ठेवी असलेल्या बँकांच्या गटात महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनचा सर्वोत्कृष्ट बँकेचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कारही बँकेने पटकावला होता.

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
(जाहिर सूचना)

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) यांच्याकडून, मुंबईतील 'के/पूर्व' (K/E) विभाग, मौजे मजास, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३ येथील पीएमजीपी कॉलनी, पूनम नगर सर्व्हे क्र. ४२, हिस्सा क्र. ०३ (भाग); सीटीएस क्र. १७५/बी/१ (भाग), १९१/५ (भाग), १९३/बी (भाग)) या मिळकतीवर, DCPR-2034 मधील विनियम क्र. ३३(५) अंतर्गत अस्तित्वातील जीर्ण झालेल्या १७ इमारतींचे (पुनर्वसन) पुनर्विकास, तसेच MHADA गृहनिर्माण योजनेअंतर्गत LIG, MIG व HIG प्रवर्गातील सदनिका आणि व्यावसायिक गाळ्यांसह विक्री इमारतीच्या भूखंडाचा प्रस्तावित विकास, लेआउट/उपविभाग/एकत्रीकरण यास पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) प्रदान करण्यात आली आहे.

सदर पर्यावरणीय मंजुरी **EC Identification No. EC26B3813MH5186132N, फाईल क्र. SIA/MH/INFRA2/590915/2026** अन्वये प्रदान करण्यात आली आहे. सदर पर्यावरणीय मंजुरीच्या पत्राची प्रत MoEF&CC/SEIAA च्या PARIVESH पोर्टलवर (https://parivesh.nic.in) उपलब्ध आहे.

Follow us: @mhadaofficial

म्हाडा–गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
CPRO/A/870

(स्वाक्षरी)
कार्यकारी अभियंता
विशेष प्रकल्प कक्ष / मुंबई मंडळ

शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"
३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ई-मेल : fra.govmh@gmail.com
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, संकेतस्थळ : www.mahafra.org
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) संपर्क : ०२२-३१९८०३४८ | ८८२८७ ८६२६४

दिनांक : २६/११/२०२६

जाहिरात

शुल्क नियामक प्राधिकरणाकडे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्क यांचे विनियमन) सुधारणा कायदा अधिनियम २०२६ च्या कलम १४ (ख) नुसार विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक संस्थांचे शुल्क निर्धारणासाठीचे प्रस्ताव दरवर्षी प्राधिकरण कार्यालयाकडे येत असतात.

सदर संस्थांच्या प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी कायदा (सुधारणा) अधिनियम २०२६ मधील कलम १४ (ड) अन्वये छाननी कक्ष स्थापन करण्याची तरतूद आहे.

सदर प्रस्तावांची छाननी करताना प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्था, महाविद्यालये यांनी विद्यपीठे, त्या-त्या विषयाचे परिषद, प्राधिकरणे वगैरेच्या निकषांप्रमाणे कर्मचारी वृंद नेमणूक किंवा पायाभूत व इतर सुविधा उपलब्ध करून त्याप्रमाणे खर्च केला आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी खालील विभागातील खाली दर्शविलेल्या पदांवरून किंवा दर्शविलेल्या पदांपेक्षा वरिष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची छाननी कक्षात कंत्राटी स्वरूपात नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

उच्च शिक्षण विभाग	सहसंचालक, उप-संचालक, कुलसचिव, उप कुलसचिव, सहायक कुलसचिव, सहायक प्राध्यापक
तंत्र शिक्षण विभाग	सहसंचालक, उप संचालक, सहायक प्राध्यापक
वैद्यकीय शिक्षण विभाग	सहसंचालक, उप संचालक, सहायक प्राध्यापक
आयुष विभाग	सहसंचालक, उप-संचालक, सहायक प्राध्यापक
महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषद	सहसंचालक (प्रशासन), उप संचालक, कुलसचिव, उप कुलसचिव, सहायक कुलसचिव, सहायक प्राध्यापक

अटी व शर्ती :

१) अर्ज करताना सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नावाने करावेत.
२) अर्जदाराचे वय ६५ वर्ष.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. १५२५/प्र.क्र. ३७/आस्था नं. (का-१३ दि. १० जून, २०२५ अन्वये एकत्रित मानधन देण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ देय राहणार नाहीत. वास्तव Pension Order ची प्रत जोडण्यात यावी.
४) नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात असून एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल किंवा सदर कालावधीत वाढ होऊ शकते.
५) मुख्यालय मुंबई येथे राहील. कार्यालयीन कामासाठी मुंबई महानगर क्षेत्राच्या बाहेर जायचे असल्यास प्रवास भत्ता व महागाई भत्ता (TA/DA) दिला जाईल.
६) शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कार्यालयात उपस्थित राहून पूर्णवेळ काम करावे लागेल. ७) संस्थांच्या / महाविद्यालयांच्या तपासणीचे काम करणे.
(८) प्राधिकरणातील मा. अध्यक्ष, मा. सदस्य तसेच मा. सचिव यांच्या निर्देशानुसार सोपविण्यात येणारी सर्व कामे.
९) संगणकावर काम करण्याचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे.
१०) तसेच निवड प्रक्रिया मुलाखतीद्वारे करण्यात येईल.
११) अर्जदारावर कोणताही गुन्हा, शिस्तभंगाची कारवाई किंवा गैरवर्तनाची नोंद नसावी.
१२) रु. ५००/- च्या Stamp Paper वर नाव, वय व सेवानिवृत्ती वेळेचा हुद्दा व वेतन नमूद करून आजमितीला कोणतीही विभागीय चौकशी व फौजदारी गुन्हा नाही याची नोंद करावी.
१३) शुल्क नियामक प्राधिकरणाकडे शुल्क निश्चितीसाठी येणाऱ्या कोणत्याही संस्थेशी स्वतः संलग्न नाही असे घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त नमूद कागदपत्रांसह दिनांक १५/१२/२०२६ पर्यत प्राधिकरण कार्यालयात ईमेलद्वारे fra.govmh@gmail.com किंवा पोस्टाने अर्ज सादर करावेत.

स्वाक्षरित /-
सदस्य सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण,
मुंबई

डीजीआयपीआर/२०२६-२७/४११५

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित
(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
महाप्रित
अभिरुची अभिव्यक्ती सूचना

महाप्रित मार्फत "N2 आणि N3 श्रेणीतील इलेक्ट्रिक मालवाहू वाहनांच्या (ई-ट्रक) खरेदीसाठी स्पर्धात्मक दर प्राप्त करण्याच्या उद्देशाने स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविण्यात येत आहेत." स्वारस्य अभिव्यक्ती EOI संबंधी कागदपत्रे https://mahatenders.gov.in आणि https://mahapreit.in या अधिकृत संकेतस्थळांवर पाहता व डाउनलोड करता येतील. EOI सादर करण्याची अंतिम तारीख १७/१२/२०२६.

कार्यकारी संचालक (रेस्को) महाप्रित, मुंबई

बारामती नगरपरिषद, बारामती
विद्युत विभाग
ई-निविदा सुचना क्र. ०३/२०२६-२०२७ (ऑनलाईन)
Parent Portal: http://mahatenders.gov.in

जा. क्र. बानप/विवि/कार्या.१८/५३६/२०२६-२०२७ *दिनांक:२६/११/२०२६*

बारामती नगरपरिषदेच्या विद्युत विभागाकडील, **बारामती नगरपरिषद क्षेत्रातील इतर भागांमध्ये स्ट्रीट लाईट पोल उभारणे** या कामाकरिता ई-निविदा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती यांचेकडून मागविण्यात येत आहे. कामाचे कागदपत्रे डाऊनलोड करणे व बीड सबमिशन करणेची मुदत **दिनांक २७/११/२०२६** वेळ **दुपारी १५.०० वाजता** ते **दिनांक १०/१२/२०२६** वेळ **दुपारी १५.०० वाजेपर्यंत** राहील. सदर कामाचा तांत्रिक लखोटा व कामाची मुळ निविदा **दिनांक ११/१२/२०२६** वेळ **दुपारी १५.०० वाजता** मुख्याधिकारी, बारामती नगर परिषद, बारामती यांचे कार्यालयात उघडणेत येईल. या कामासंबंधी सविस्तर तपशिल **http://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
(पंकज अनिल भुसे)
मुख्याधिकारी गट-अ
बारामती नगर परिषद, बारामती

मध्य रेल्वे
ई-लिलावाची सूचना

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने www.ireps.gov.in या संकेतस्थळावर ई-लिलाव लीजिंग मॉड्यूलद्वारे खाली दिलेल्या मालमत्ता भाडेतत्त्वावर देण्यासाठी ई-लिलाव जाहीर केला आहे. **इच्छुक बोलीदारांनी ई-लिलावापूर्वी ई-लिलाव लीजिंग मॉड्यूलमध्ये नोंदणी करणे आणि सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.** अधिक माहितीसाठी, इच्छुक बोलीदारांनी खाली नमूद केलेल्या ई-लिलावाचा तपशील जाणून घेण्यासाठी **www.iresp.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

अ.क्र.	श्रेणी	उप-श्रेणी	लिलाव सुरू होण्याची तारीख
१	जाहिरात	उपनगरीय गाड्या आणि मेल एक्स्प्रेसमधील अंतर्गत आणि बाह्य फिरती मालमत्ता	०३.१२.२०२६, ०५.१२.२०२६ ०९.१२.२०२६
		आरडीएन (रेल डिस्प्ले नेटवर्क)	०१.१२.२०२६
		ओओएच	२७.११.२०२६, २८.११.२०२६ ३०.११.२०२६, ०२.१२.२०२६ ०७.१२.२०२६, ०८.१२.२०२६ ११.१२.२०२६
२	पे आणि पार्किंग	मिश्र पार्किंग	३०.११.२०२६, ०१.१२.२०२६ ०४.१२.२०२६, ०७.१२.२०२६ ०८.१२.२०२६
३	पार्सल	पार्सल, एसएलआर	२७.११.२०२६, ०४.१२.२०२६
४	पैसे द्या आणि वापरा	टॉचलेट PnU6, PnU-7	२७.११.२०२६, ३०.११.२०२६ ०९.१२.२०२६
६	इतर एनएफआर	निर्जंतुकीकरण केलेल्या दर्जेदार बेडरोल सेवांचा पुरवठा करणे	०४.१२.२०२६
		३० ठिकाणी ईएमआर	०२.१२.२०२६
		पीएनव्हीएल येथील क्लॉकरूम	१०.१२.२०२६
		एनजीटीएन गुड्स शेड येथील गोदामासाठी करार	३०.११.२०२६
		डीआयजीएच येथे प्रीमियम स्टोअर	२७.११.२०२६
		दादर स्टेशनवर पार्सल रचण्याचे काम	१४.१२.२०२६
		टीएपीजी गुड्स शेड येथील ट्रक सर्व्हिसिंग सेंटर	१५.१२.२०२६
		ऑन बोर्ड मोफत जीवनशैली मासिकाचे वितरण	०३.१२.२०२६
		अनुक्रमे ०६ ठिकाणी किराणा दुकान	०१.१२.२०२६, ०७.१२.२०२६ १०.१२.२०२६
		डीआयजीएच आणि सीएसएमटी येथील सलून सेवा केंद्र	२८.११.२०२६, ०५.१२.२०२६
		स्टेशनवर आराम खुर्ची	१२.१२.२०२६
		एलटीटी आणि केवायएन येथे ईव्ही चार्जिंग	०८.१२.२०२६
		०७ ठिकाणी मोबाईल आणि ॲक्सेसरीजचे किऑस्क	०४.१२.२०२६, ०९.१२.२०२६
		खंडाळा स्टेशनजवळ गेमिंग झोनची सुविधा	११.१२.२०२६
		०२ स्टेशनवरील बेंटरी बदलण्याची केंद्रे	०३.१२.२०२६

सदर लिलावांशी संबंधित पुढील पुरवणी/ शुद्धिपत्रक, लॉट/ कॅटलॉग मागे घेणे, तारखेत बदल, मुदतवाढ, स्पष्टीकरण इत्यादी, काही असल्यास, केवळ वेबसाइटवर अपलोड केले जातील. बोली लावणाऱ्यांनी अद्ययावत राहण्यासाठी वेबसाइटला नियमितपणे भेट द्यावी.

अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे

Thomas Cook
थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ११ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई – ४०० ०१३
दूरध्वनी क्र.: +९१-२२-४२४२ ७००० फॅक्स क्र.: +९१-२२-२३०२ २८६४
संकेतस्थळ: https://www.thomascook.in | ई-मेल: sharedept@thomascook.in
कंपनी ओळख क्रमांक (CIN): L63040MH1978PLC020717

असाधारण सर्वसाधारण सभेच्या सदस्यांना सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड (यापुढे "कंपनी" असे संबोधले आहे) यांच्या सदस्यांची असाधारण सर्वसाधारण सभा ("EGM") सोमवार, २१ डिसेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४:०० वाजता (भारतीय प्रमाण वेळ – IST) किंवा राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (NCLT) बोलावलेल्या सभेची समाप्ती झाल्यानंतर तात्काळ, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("VC")/इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे ("OAVM") आयोजित करण्यात येईल. ही सभा कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमांतील लागू तरतुदी, तसेच भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धतेची बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ ("SEBI (LODR) Regulations, 2015") आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("MCA") तसेच भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ ("SEBI") यांनी जारी केलेल्या संबंधित परिपत्रकांनुसार आयोजित केली जाईल. सभासदांना एका सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित न राहता, EGM च्या सूचनेत नमूद केलेले विषय हाताळले जातील. EGM चे मान्यताप्राप्त ठिकाण कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असेल.

EGM ची सूचना गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्या सर्व सदस्यांना पाठविण्यात आली आहे, ज्यांनी कंपनीकडे/नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("डिपॉझिटरीज")/MUFG इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ("RTA") यांच्याकडे आपले ई-मेल पत्ते नोंदविले आहेत.

सदस्यांनी नोंद घ्यावी की EGM ची सूचना कंपनीच्या www.thomascook.in या संकेतस्थळावर, तसेच स्टॉक एक्स्चेंजेसच्या संकेतस्थळांवर म्हणजेच BSE लिमिटेडचे www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे www.nseindia.com, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("NSDL") चे www.evoting.nsdl.com आणि RTA चे https://in.mpms.mufg.com/ या संकेतस्थळावरही उपलब्ध करून दिली जाईल. ज्या सदस्यांना सूचनेची छापील प्रत हवी असेल त्यांनी sharedept@thomascook.in येथे आपले नाव, फोलिओ क्रमांक/DP ID आणि क्लायंट ID नमूद करून विनंती करावी; त्यांना छापील प्रत पाठविण्यात येईल.

सदस्यांना EGM मध्ये केवळ VC/OAVM द्वारेच उपस्थित राहता येईल आणि सहभाग घेता येईल. अशा सहभागासंबंधी सविस्तर सूचना EGM च्या सूचनेमध्ये दिलेल्या आहेत.

दूरस्थ ई-मतदान आणि EGM मधील ई-मतदानासाठी सूचना

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ मधील तरतुदी, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० आणि SEBI (LODR) Regulations, 2015 मधील विनियम ४४, तसेच भारतीय कंपनी सचिव संस्थेने जारी केलेले सर्वसाधारण सभांवरील सचिवीय मानक (SS-2) यांचे पालन करून, EGM च्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर सदस्यांना NSDL द्वारे उपलब्ध करून दिलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा ("दूरस्थ ई-मतदान") वापर करून मतदान करण्याची सुविधा देण्यात येत आहे. दूरस्थ ई-मतदान आणि EGM मधील ई-मतदानासाठीच्या सविस्तर सूचना EGM च्या सूचनेतील टिपांमध्ये दिलेल्या आहेत. सदस्यांनी खालील बाबींची नोंद घ्यावी:

अ.क्र. व तपशील	दिनांक व वेळ
१) दूरस्थई-मतदानसुविधातसेचEGM मधील मतदानासाठीसदस्यांचीपात्रता निश